# सण आलाय! साजरा करा टाटा कॅपिटल सादर करत असलेल्या एमसीएचआय- क्रेडाई ''ग्रेट मुंबई प्रॉपर्टी फेस्टिव्हल २०१६'' सोबत

**मुंबई, ऑक्टोबर २०१६:** या सणांच्या हंगामात ६-९ ऑक्टोबर २०१६ दरम्यान एमएमआरडीए ग्राऊंड्स, बीकेसी येथे एमसीएचआय- क्रेडाईने आयोजित केलेल्या २१००० चौ. फुटांमध्ये पसरलेल्या भारताच्या सर्वांत मोठ्या प्रॉपर्टी शोला जरूर भेट द्या. मोफत प्रवेश असलेल्या या प्रदर्शनात प्रत्येकाचे स्वागत आहे. पहिल्या दिवशी मालमत्ता आणि गृहवित्तपुरवठा पर्याय दाखवण्यात आले आणि त्यासोबत १० लाख रूपयांपासून ते १० कोटी रूपयांपर्यंत असलेल्या मालमत्तांवर अभूतपूर्व व नंतरही कधी न होणाऱ्या ऑफर्स दिल्या जाणार आहेत.

१५ वर्षे आणि २६ आवृत्त्यांमध्ये ३० लाखांपेक्षा अधिक ग्राहकांना घरे मिळवून दिल्यानंतर हे मालमत्ता प्रदर्शन आता घर खरेदीदारांना महत्त्वाचे आंतरराष्ट्रीय प्रकल्प, अनिवासी भारतीयांना खास ऑफर्स, दाखवण्यासाठी सँपल फ्लॅट्स, लकी ड्रॉ, विकासकांकडून १५ लाख रूपये आणि कॅश बॅक ऑफर्स, वित्तपुरवठ्याचे अनेक पर्याय, परवडणाऱ्या तसेच ऐषारामी वर्गातील मालमत्ता देशभरात असलेल्या दाखवल्या जातील. २१ सप्टेंबर रोजी सुरू झालेल्या डिजिटल एक्स्पोला १२००० चौकशा आल्या असून त्याला प्रचंड प्रतिसाद मिळाला आहे. विविध ऑफर्स आणि मालमत्तांचे पर्याय पाहण्यासाठी आपण www.mchihomes.com येथे भेट देऊ शकता.

१० टक्के आत्ता भरा आणि उरलेली फिटआऊट नंतर

आलीशान कार, सोन्याची नाणी आणि आंतरराष्ट्रीय सहली जिंकण्याची संधी

ग्राहकांवरील पैशांचा ताण करण्यासाठी आकर्षक योजना

२ लाख रूपयांपासून ते २४ लाख रूपयांपर्यंत थेट रोख सवलती

मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क माफ

**श्री. तेजस व्यास, अध्यक्ष, प्रदर्शन समिती** म्हणाले की, ''पुढे जात असताना घर ग्राहकांकडून मागणीतील वाढ ही मुख्यत्वे मध्यम वर्गातील आणि परवडणाऱ्या घरांच्या वर्गात असेल आणि ती मोठ्या शहरांच्या दुय्यम किंवा आसपासच्या परिसरातील असेल. त्यामुळे आम्हाला आनंद आहे की, एमसीएचआय-क्रेडाईकडून हे आणले गेले आहे. यंदाचे प्रदर्शन अनेक प्रकारे खास असेल आणि आम्ही चोवीस तास आमच्या सहभागींना तसेच अभ्यागतांना अविस्मरणीय अनुभव देण्यासाठी काम करत आहोत. आम्ही आशावादी आहोत की, एमसीएचआय- क्रेडाई मालमत्ता प्रदर्शनाची ही २७वी आवृत्ती ग्राहकांच्या भावनांना चालना देण्यासाठी महत्त्वाची ठरेल आणि या सणांच्या कालावधीत त्याची फळे मिळतील.''

ग्रेट मुंबई प्रॉपर्टी एक्झिबिशनमध्ये सहभागी झालेल्या आघाडीच्या विकासकांमध्ये डीबी रिअल्टी, कनकिया स्पेसेस, अजमेरा रिअल्टी, राजेश लाइफ स्पेसेस, साई इस्टेट, ए अँड ओ रिअल्टी, नीलकांत ग्रुप, ऑयस्टर लिव्हिंग, विजय सुरक्षा, पिरामल रिअल्टी, रोमेल ग्रुप, वाधवा ग्रुप, गोदरेज प्रॉपर्टीज, मेफेयर हाऊसिंग आणि नीलकांत ग्रुप इत्यादींचा समावेश आहे. आघाडीच्या बँका आणि एचएफसी जसे एसबीआय, ॲक्सिस बँक, आयसीआयसीआय बँक, पीएनबी, देना बँक, युको बँक, एचडीएफसी, पीएनबी हाऊसिंग फायनान्स, टाटा कॅपिटल, इंडिया बुल्स हाऊसिंग फायनान्स, एलआयसी हाऊसिंग फायनान्स आणि इतर अनेकांचा समावेश होता.

या निमित्ताने बोलताना, **श्री. गोविंद शंकरनारायणन** म्हणाले की- टाटा कॅपिटल हाऊसिंग फायनान्स लिमिटेडला एमसीएचआय-क्रेडाईशी जोडले जाताना खूप आनंद होत आहे. गृहवित्त कंपन्या आणि विकासक यांच्यासाठी हे एक उत्तम व्यासपीठ आहे, कारण घरांसाठी आता मागणी वाढू लागली आहे. टाटा कॅपिटल हाऊसिंग फायनान्स लिमिटेड सर्व ग्राहक वर्गांसाठी सर्वांगीण गृहवित्त योजना देण्यासाठी वचनबद्ध आहे. परवडणाऱ्या घरांच्या वर्गात आमचा प्रवेश आणि शहरी मध्यम उत्पन्न वर्गावर सातत्यपूर्ण असलेला भर यांद्वारे आमचे उद्दिष्ट हे प्रत्येक संभाव्य घर ग्राहकाला स्वत:च्या मालकीचे घर घेण्यासाठी सबल करण्याचे आहे.

या निमित्ताने बोलताना, **श्री. आर. वैतीनाथन, व्यवस्थापकीय संचालक, टाटा कॅपिटल हाऊसिंग फायनान्स लिमिटेड** म्हणाले की, ''टाटा कॅपिटल हाऊसिंग फायनान्स एक सर्वांगीण घर वित्तपुरवठादार होण्याबाबत वचनबद्ध असून ते बाजाराच्या सर्व वर्गांमध्ये उपस्थित आहे आणि विकासक तसेच घर ग्राहक यांनाही ते सेवा देते. त्यामुळे आम्हाला एमसीएचआय या खूप चांगली व्याप्ती आणि सर्व वर्गांमध्ये पोहोच देणाऱ्या कंपनीशी जोडले जाताना खूप आनंद होत आहे. हा एक्स्पो हे गृहवित्त कंपन्या आणि विकासकांसाठी एकत्र येऊन त्यांची ऑफरिंग दाखवणे, मालमत्ता बाजारातील सर्व समभागधारकांना उत्तम मूल्य देण्यासाठी एक चांगले व्यासपीठ आहे.''

**सन्माननीय पाहुणे, श्री. जेम्स लॉ, संस्थापक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी जेम्स लॉ सायबरटेक्चर** म्हणाले की, ''भारतीयांच्या नवीन पिढीला राहण्यासाठी आणि काम करण्यासाठी नवीन वास्तुरचनेची आवश्यकता भासणार आहे. आम्हाला या एक्स्पोमध्ये स्मार्ट इमारती आणि स्मार्ट शहरांच्या संधी पाहता येतील आणि राहण्यासाठी तसेच काम करण्यासाठी चांगले पर्यावरण निर्माण करता येईल तसेच भारतीय शहरांच्या भविष्यासाठी चांगली गुंतवणूकही करता येईल.''

या एक्स्पोने गृह ऑटोमेशन सुविधा, आंतरराष्ट्रीय टूर्स, शून्य अधिक खर्चावर मोड्यूलर किचन, ५० टक्क्यांची किंमत सवलत, जिम आणि मनोरंजन क्लब्समध्ये सदस्यत्व, मोबाइल फोन/ लॅपटॉप/ आयपॅड, शून्य अधिक खर्चावर इलेक्ट्रॉनिक उपकरणे, बुकिंग केल्यावर शुभेच्छांच्या स्वरूपात सोन्याचे नाणे, जीवनशैली स्टाइल वाढवण्यासाठी आणि ग्राहकांच्या मनात चांगल्या भावना निर्माण करण्यासाठी फ्लॅट बुक केल्यावर गाडी अशा अनेक ऑफर्स दिल्या असून सध्या मालमत्ता बाजारात अनेक गोष्टी घडत असल्यामुळे ती बदलांच्या टप्प्यातून जात आहे.

**श्री. धर्मेश जैन, अध्यक्ष, एमसीएचआय- क्रेडाई** म्हणाले की, ''मालमत्ता बाजारातील व्यवहार आणि संबंधित उपक्रमांमध्ये खूप गुंतागुंत आणि कायदेशीर गोष्टी असतात. अनेक वेळा असे झाले आहे की, विकासकाने दिलेले वचन पूर्ण केलेले नाही किंवा ताब्याच्या तारखांना उशीर झाला. विकासकांना जबाबदार धरले जाऊ शकत नव्हते कारण कोणताही कायदा अस्तित्त्वात नव्हता. आम्हाला आनंद आहे की, आता कायद्याला एक संतुलित रूप मिळत आहे आणि त्याला ग्राहक व विकासकांकडूनही मान्यता मिळत आहे. त्यामुळे यावर्षी आमच्या एक्स्पोमधील भर हा सिंगल विंडो समायोजन यंत्रणा देण्यावर आहे, ज्याचा फायदा ताबा देण्यातील विलंबाचा प्रश्न सोडवण्यासाठी तर होईलच पण त्यांना आपल्या स्वप्नातील घर खरेदी करताना मूल्यही मिळेल.''

**टी. डी. जोसेफ, एमसीएचआय-क्रेडाईचे इव्हेंट प्रमुख** म्हणाले की, ''हे प्रदर्शन वाणिज्यिक, रिटेल, दुसरी घरे आणि भूखंड तसेच निवासी घरे आणि भूखंड यांच्यासाठीही एक चांगली जागा आहे. आम्हाला अभिमान वाटतो की, हा एकच असा एक्स्पो आहे जिथे यावर्षीच्या आधीच्या प्रदर्शनांमध्ये खूप चांगल्या डील्स केल्या आणि याही वर्षी आम्हाला चांगल्या प्रतिसादाची अपेक्षा आहे.''

घर ग्राहक या सणांच्या कालावधीचा फायदा या प्रॉपर्टी एक्स्पोला भेट देऊन घेऊ शकतात. त्यात मर्यादित कालावधीच्या ऑफर्स आहेत, जेणेकरून ते पैशांची बचत करू शकतील. एकाच छताखाली सर्व गृहनिर्माण प्रकल्प असून ते सर्वांच्या गरजा पूर्ण करतात- आलीशान ते परवडणारे, व्यावसायिक ते निवासी असे सर्वकाही वन स्टॉप शॉप ठरणार आहे.

**एमसीएचआय विषयी**

महाराष्ट्र चेंबर ऑफ हाऊसिंग इंडस्ट्रीज (एमसीएचआय-क्रेडाई) या संस्थेची स्थापना १९८२ साली झाली. ती मुंबई आणि एमएमआरमधील रिअल इस्टेट विकासकांची एक अग्रगण्य आणि एकमेव मान्यताप्राप्त संस्था आहे. एमसीएचआय-क्रेडाई ही रिअल इस्टेट विकासाच्या क्षेत्रात कार्यरत असलेल्या सदस्यांना एकाच सामायिक व्यासपीठावर आणते आणि उद्योगाला भेडसावत असलेल्या समस्यांवर उपाय शोधण्याचा प्रयत्न त्या माध्यमातून केला जातो. एमसीएचआय-क्रेडाईकडे मुंबईतील साधारण १८०० आघाडीच्या विकासकांचे सदस्यत्व आहे आणि ती आता एमएमआर क्षेत्रात विस्तारली आहे. तिच्या शाखा ठाणे, कल्याण-डोंबिवली, मिरा-विरार सिटी, रायगड आणि नवी मुंबई येथे आहेत. मुंबई आणि एमएमआरमधील तब्बल ८० टक्के नवीन निवासी संकुले आणि व्यावसायिक प्रॉपर्टींचा विकास हा एमसीएचआय-क्रेडाईच्या सदस्यांकडून केला जात आहे. प्राथमिक गरज असलेली घरे पुरविण्याच्या आपल्या उद्दिष्टाची पूर्तता करण्यासाठी एमसीएचआय-क्रेडाई केंद्र आणि राज्य सरकारांना मदत करते. एमसीएचआय-क्रेडाई सर्वसाधारण लोकांमध्ये तसेच रिअल इस्टेट आणि बांधकाम उद्योगामध्ये जागरुकता आणण्याच्या दृष्टीने आणि त्याचवेळी मुंबई व एमएमआरमधील प्रकल्पांवरील व नवीन विकास कामांवरील परिपूर्ण माहिती देण्याच्या कामात कार्यरत आहे. एमसीएचआय-क्रेडाई ही भारतातील खाजगी रिअल इस्टेट डेव्हलपर्सची शिखर संस्था, कन्फेडेरेशन ऑफ रिअल इस्टेट डेव्हलपर्स असोसिएशन्स ऑफ इंडिया (क्रेडाई)ची सदस्य आहे आणि आघाडीच्या उद्योग संस्थांशी सुद्धा संलग्न आहे, जसे सीआयआय, फिक्की, आयएमसी व इतर.